**CNR No.MHSI010005072026**

**अटकपुर्व जामीन अर्ज क्र. ९६/२०२६ ( महाराष्ट्र शासन वि.संदिप गणपत तानवडे व.२ ) मधील नि.१५ वरील आदेश.**

१. प्रस्तुतचा अटकपुर्व जामीन अर्ज हा आरोपी श्री.संदिप गणपत तानवडे व.२ यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८२(१) नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदारांविरुध्द वैभववाडी पोलीस ठाणे येथे दि.२७/०४/२०२६ रोजी सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम २०१० चे कलम ४ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२१(१),१३२,३५२,३(५) गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ दाखल करणेत आलेला आहे. सदर मूळ अर्जामध्ये नि.क्र.४ वर आरोपींविरुध्द अंतरिम अटकपुर्व जामीनाचा आदेश झालेला आहे. सदर आदेशपुढे चालू ठेवणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावर सरकरी अभियोक्ता यांनी आज रोजी म्हणणे दाखल केले नाही. सबब, अर्ज विना म्हणणे चालविणेत येत आहे.

४. अर्ज वाचला. कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. दरम्यानच्या कालावधीत अर्जदार यांना अटक झाल्यास त्यांनी दाखल केलेला मूळ अर्ज निष्फळ ठरणार आहे. मूळ अटकपुर्व जामीन अर्ज चालवून निकाल होणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे आरोपीविरुध्द अंतरिम अटकपुर्व जामीनाचा आदेश पुढे चालू ठेवणे न्याय होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

# आदेश

१. पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे,वैभववाडी यांना असा आदेश देण्यात येत आहे की, वैभववाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २९/२०२६ मधील सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३, महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती व वैद्यकीय सेवा संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांना प्रतिबंध) अधिनियम २०१० चे कलम ४ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२१(१),१३२,३५२,३(५) अन्वये आरोपी/ अर्जदार संदिप गणपत तानवडे व. २ यांचेबाबत दि.०६/०५/२०२६ रोजी पारित केलेला अंतरिम अटकपुर्व जामीनाचा आदेश पुढील तारीख पर्यंत वाढविणेत येत आहे.

२. सदर आदेश संबंधित पोलीस ठाणे यांना कळविणेत यावा.

Digitally signed by SANTOSH TRIBHUWONNATH TRIPATHI
Date: 2026.07.14 15:27:37 +0530

सिंधुदुर्ग –ओरोस (एस.टी.त्रिपाठी)
दि.१४/०७/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग –ओरोस.